## नियमीत दिवाणी मुकदमा क्र. ४८/२०१४ मधील निशाणी ९२ वरील आदेश

[CNR No.MHRG140003772014]

१. वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश–६, नियम–१७ प्रमाणे दाव्यात दुरुस्तीसाठी केलेला आहे.

२. सदर अर्जास प्रतिवादी यांनी नि.क्र. ९४ वर म्हणणे देवून हरकत घेतलेली असून असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज प्रतिवादींना मान्य व कबुल नाही. सदरचा अर्ज खर्चासहीत फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे. वादीने सदरचा दावा सन २०१४ मध्ये दाखल केलेला असून ते आजमितीस दाव्यात दुरुस्ती मागत आहेत. तरी सदरचा अर्ज खर्चासहीत फेटाळण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

३. अर्ज, म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४. वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ आले आहेत. सदरचे मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

### कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत–**

५. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादींनी सदरचा दावा ठरावाकरीता व तुर्तातुर्त मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. वादींचे असे कथन आहे की, सदरचा दावा वादीचे पुराव्याकामी नेमण्यात आलेला आहे. सदहू दाव्याच्या विनंती

कलम 'ब' मध्ये दावा मिळकतीवर झालेल्या हक्कनोंद क्र. ६३६, ११९२ हया रद्द झाल्याचे जाहीर करुन वादीच्या नावाची हक्कनोंद दावा मिळकतीवर कायम करुन मिळावी या ऐवजी दावा मिळकतीवर वादीच्या नावाची नोंद कायम करुन मिळावी अशी दुरुस्ती करणेकरीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. वादींचे पुढे असे कथन आहे की, वादी मागतात ती दावा दुरुस्ती दावा दाखल झाल्यानंतर व सदरचा दावा न्यायप्रविष्ठ असतानाची दुरुस्ती असल्याने वादी मागतो ती दुरुस्ती योग्य व आवश्यक आहे.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने मागितलेली दावा दुरुस्ती या दाव्याच्या दृष्टीने महत्वाची असल्याने सदरची दावा दुरुस्ती मंजूर करणे योग्य होईल. सदरचा वादीचा दुरुस्ती अर्ज मंजूर झालेस दाव्यात आवश्यक असलेला मजकूर नमूद केल्यास दावा गुणदोषांवर न्यायनिर्णीत करणेस मदत होणार आहे. सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही किंवा दाव्याचे स्वरुपात बदल होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदर दावा दुरुस्ती खर्चासह मंजूर करुन दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायोचित होणार आहे. वादीने दावा दुरुस्ती विलंबाने मागितली असल्याने वादीवर खर्च आकारणे योग्य व न्यायोचित होईल. सबब, वरील विवेचनावरुन मी मुद्दा क्रमांक १ साठी होकारार्थी मत नोंदवत आहे व मुद्दा क्रमांक २ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | वादींचा अर्ज रुपये ५००/– खर्चावर मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | वादीने खर्चाची रक्कम ५००/– प्रतिवादी क्र. १ ते ८ यांना देणेत यावी. |
| ३. | वादींनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत खर्चाची रक्कम प्रतिवादींना देवून दाव्यामध्ये योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी. |
| ४. | वादींनी दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी दयावी. |

| | |
|---|---|
| ५. | सदर खर्चाची रक्कम वादींनी पुढील नेमल्या तारखेच्या आत प्रतिवादींना द्यावी अन्यथा सदरचा आदेश रद्द समजणेत येईल. |

ठिकाण – उरण
दिनांक: ०३.१०.२०२३

( निलेश एम. वाली )
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.